N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** मलकापूर शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0055 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/02/2024 19:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 29/01/2024

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/01/2024

**Time From (वेळेपासून):** 15:58 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/02/2024 **Time (वेळ):** 18:36 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 041

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/02/2024 18:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 06 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** श्रीकष्ण अँक्वा RO प्लान्ट , बेलाड फाटा, मलकापुर , मलकापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्रीकृष्ण वसंतराव पवार

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1957

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामवाडी मलकापुर ,मलकापुर ,मलकापूर शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रामवाडी मलकापुर ,मलकापुर ,मलकापूर शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आकाश सुरेश क्षिरसागर | | | 1. मराविविक मर्या मलकापुर , मलकापुर ,मलकापूर शहर, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत<br>2. विद्युत कॉलणी प्लॉट न10 जळगाव,जळगाव ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | महादेव कडु पारधी | | | 1. प्रियका नगर हेलोडे आपरमेंट , मलकापुर ,मलकापूर शहर, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

श्रीकृष्ण वसंतराव पवार, वय 67 वर्षे, व्यवसाय शेती, रा. रामवाडी, मलकापुर ता. मलकापुर जि. बुलडाणा, मो.नं. 9673993903मी समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो. मी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मलकापुर विभाग येथुन दिनांक 31-07-2015 रोजी रोखपाल या पदावरुन सेवानिवृत्त झालेलो आहे.मी दिनांक 29.01.2024 रोजी लोकसेवकाविरुध्द लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार असल्याबाबत मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांना कळविले होते. त्यावरुन त्यांनी मला सांगीतले की, आमचे एक अधिकारी आपणास संपर्क करतील. त्यानुसार मला पोलीस निरीक्षक श्री. सचिन इंगळे, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी फोनवर संपर्क करुन मलकापुर येथील बेलाड फाटा येथे थांबण्याबाबत सुचीत केले.दिनांक 29.01.2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री सचिन इंगळे हे एका वाहनाने कारवाई पथकासह बेलाड शिवारात हजर आले. तेव्हा पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांनी स्वतःचा तसेच सापळा पथकातील इतर कर्मचारी तसेच पंचांचा परीचय करुन दिला. तसेच दोन्ही पंचापैकी पंच क्र.1 श्री. विनोद मोतीराम चंदनशिव व पंच क्र.2 म्हणुन सौ. कविता रत्नदिप पवार असे नेमुन पोलीस निरीक्षक श्री. सचिन इंगळे यांच्याकडे मी माझी लेखी तक्रार दिली की, माझे शेतीशेजारी माझा साला श्री. लहु वामनराव तायडे रा. पान्हेरा ता. मलकापुर यांची शेती आहे. सदर शेतीमध्ये माझा मुलगा संतोष श्रीकृष्ण पवार याने श्रीकृष्ण आरओ प्लान्ट सुरु केलेला आहे. त्यासाठी औदयोगीक विज मिटर घेतलेले आहे. गट नं.54 मधील इलेक्ट्रीक पोल तुटल्याने शेतीची विज बंद होती. त्यामुळे मी दिनांक 28.01.2024 रोजी आरओ प्लान्टवरील विज मिटरमधुन तात्पुरत्या स्वरुपात शेतीसाठी विजेचा वापर केला. त्यावेळी मलकापुर ग्रामिण-3 केंद्राचे शाखा अभियंता श्री. क्षिरसागर व वायरमन श्री. पारधी यांनी सदर विज जोडणी पकडली. त्यावेळी कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर व वायरमन श्री. पारधी यांनी विज चोरी बाबतचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व एव्हरेज बिल कमी दाखविण्यासाठी माझेकडुन 60000/- रुपये घेवुन उर्वरीत 40000/- रुपये लाचेची मागणी करीत असुन त्यांना माझेकडुन 40000/- रूपये लाच घेतांना पकडुन कायदेशिर कारवाई करावी. अशा आशयाची तक्रार दिली.मी दिलेली तक्रार सोबत असलेल्या दोन्ही पंचाना वाचण्यास दिली व माझेकडुन तोंडी कथन करण्यात आली. त्यांनतर पंच क्र.1 विनोद चंदनशिव यांनी त्यावर त्यांचे स्वहस्ताक्षरात शेरा मारुन दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या आहेत.त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री. सचिन इंगळे यांनी दोन्ही पंचाना तसेच मला पडताळणी पुर्व पंचनाम्याप्रमाणे सुचना देवुन सोबत आणलेल्या व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहीती देवुन त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा केला. त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री. सचिन इंगळे साहेब यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्या गळयामध्ये लटकवुन देवुन मला व पंच क्र.1 श्री. चंदनशिव यांचे सह माझे मोटारसायकलने श्रीकृष्ण अॅक्वा आरओ प्लान्ट येथे वायरमन श्री. पारधी व कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करण्याकरीता 15.58 वा. रवाना केले. त्यावेळी मी व पंच क्र.1 श्री. चंदनशिव असे आम्ही दोघांनी माझे मोटारसायकलने श्रीकृष्ण अॅक्वा आरओ प्लान्ट येथे जावुन वायरमन श्री. पारधी यांची भेट घेतली असता, वायरमन श्री. पारधी म्हणाले की, एकदा बोलून घेवू (लोकसेवक श्री. क्षिरसागर यांना उद्देशुन), तुम्ही तुमच्या येच्यातून लावा फोन, नाही त मग महया येच्यातून बोला, असे म्हणुन लोकसेवक श्री. क्षिरसागर यांना फोन लावला, बोलने सुरु करतांनाच फोन बंद झाला. काही वेळानंतर कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांचा वायरमन श्री. पारधी यांचे मोबाईलवर फोन आला. वायरमन श्री. पारधी यांनी फोनचा स्पीकर ऑन करुन कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर, वायरमन श्री. पारधी व मी असे आमच्यामध्ये कामासंबधी बोलणी झाली. तेव्हा वायरमन श्री. पारधी हे कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांना म्हणाले की, साहेब मी काय म्हणतो, हे पवार भाऊ

बोलताय, त्यावर कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर म्हणाले की, हं. काय म्हणता, त्यावर मी म्हणालो की, म्हटल आता माझाकडे काही जास्त पैशे नाही बुवा हं, वीस हजार रुपये मी तुम्हाल त्याच्यावर नाही देवू शकत, पैशेच नाही मज जवळ त काय, त्यावर कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर म्हणाले की, तेवढ्यान काय येते, चव्हाण बुवाकड जावून आले म्हणे तुम्ही, त्यावर मी म्हणालो की, मी कशाले जावू हो तिकडे मले माहीत बी नाही, तुम्ही ते हे पहा, तेव्हा वायरमन श्री. पारधी म्हणाले की, साहेब तो विषय काही नाही, तो झाला स्वॉल त्याचा काही विषय नाही, ते आता विस देताय फक्त मग त्याच्या वरती काही नाही म्हणजे, त्यावर कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर म्हणाले की, बर घ्या, त्यावर वायरमन श्री. पारधी म्हणाले की, कसं आहे अन ते आपल ते तुम्ही ते बनवेल आला रिकवायरमेंन्ट हे त्याची समजा हे करून टाका, तेव्हा कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर म्हणाले की, आता बर त्यांना विचारा इकडे तिकडे हे काही करू नका म्हणा, असे म्हणुन वायरमन श्री. पारधी यांचेसोबत फाटयावर येवुन भेटण्यासाठी येण्याबाबत सांगीतले. त्यावरुन मी व पंच क्र.1 श्री. चंदनशिव असे माझे मोटार सायकलने व वायरमन श्री. पारधी त्यांचे मोटार सायकलने म.रा.वि.वि.क. मर्या मलकापुर विभाग 3 कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी मी, कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांचेशी कामासंबंधाने बोलणी केली. बोलणी दरम्यान आम्ही चहा घेण्यासाठी बेलाड फाटा येथे आलो. सदर ठिकाणी मी, कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांना म्हणालो की, साठ हजार दिले ना तुम्हाला, त्यावर कनिष्ठ अभियंता श्री क्षिरसागर म्हणाले की, हं. त्यावर मी, वायरमन श्री. पारधी यांचेकडे पाहुन म्हटले की, करे भाऊ किती दयायचे आता स्पष्ट बोल, त्यावर वायरमन श्री. पारधी म्हणाले की, विस हजार, तेव्हा कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर म्हणाले की, हं, त्यावर मी, वायरमन श्री. पारधी यांना म्हणालो की, विस जास्त होता गड्या, पहिले साठ दिले, आणखी नं विस, त्यावर वायरमन श्री. पारधी म्हणाले की, पहा बुवा तुम्ही तुमच्यासाठी केलं ते., त्यावर मी, दहा दिले तर नाही चालणार का?, असे म्हटले असता वायरमन श्री. पारधी म्हणाले की, नाही, त्यावर मी म्हणालो की, आणतो मी दहा वानखेड मधून आणि दहा हजार मग.., त्यावर कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर म्हणाले की, टाईम लागीन का, त्यावर वायरमन श्री. पारधी म्हणाले की, हां., त्यानंतर कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर हे तेथुन निघुन गेले. त्यावेळी मी, वायरमन श्री. पारधी यांना म्हटलो की, मग देतो विस आणून, अडत्या जवळून आणतो मी, तु अठीच थांब, त्यावर वायरमन श्री. पारधी म्हणाले की, घेवून या. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे माझे मोटारसायकलने कार्यवाही पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री. इंगळे साहेब यांनी व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले व त्यामध्ये झालेले संभाषण सर्वासमक्ष व्हाईस रेकॉर्डर सुरू करून ऐकले, सदर संभाषणावरून सापळा पथकातील सदस्यांची खात्री झाली की, वायरमन श्री. पारधी यांनी कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांचेसाठी पुर्वी 60000/- रुपये घेतल्याची स्पष्टोक्ती देवुन तडजोडअंती 20000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे व कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांनी लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिल्याचे स्पष्ट होवुन लाच रक्कम घेवुन येण्याचे सांगीतल्याने दिनांक 29.01.2024 रोजी सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. . त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सचिन इंगळे यांनी सांगीतल्याप्रमाणे मी लाचेची रक्कम म्हणुन आणलेले 20000/- रूपये हजर केले. ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 40 नोटा हजर केल्या. सदर नोटांचे पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांनी पंचासमक्ष नंबर नोंदवुन नोंटाना अॅन्थ्रासिन पावडर लावुन प्रत्याक्षित दाखविण्यात आले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे माझे मोटारसायकलने तसेच सापळा पथक हे सोबत आणलेल्या शासकिय वाहनाने श्रीकृष्ण अॅक्वा आरओ प्लान्ट येथे सापळा कारवाई कामी रवाना झालो.त्यानुसार आम्ही सर्वजण सापळा कार्यवाहीकामी रवाना होत असतांना बेलाड फाटा येथुन पोलीस निरीक्षक श्री. सचिन इंगळे यांनी सापळा पथकातील सदस्यामार्फत लाच रक्कम माझे शर्टाच्या खिशात ठेवुन देवुन माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून देवुन मला व पंच क्र. 1 श्री. चंदनशिव यांना माझे अॅक्टीव्हा वाहनाने श्रीकृष्ण अॅक्वा आरओ प्लान्ट येथे 18.00 वा. रवाना केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. इंगळे साहेब सापळा पथकातील सदस्य तसेच पंच क्र.2 व चालक असे शासकीय वाहनाने सापळा कार्यवाही कामी लागणारे सर्व साहीत्यासह श्रीकृष्ण अॅक्वा आरओ प्लान्ट येथे आले. सापळा पथकातील सदस्य हे शासकीय वाहनातुन उतरुन परिसरातच त्यांचे अस्तीत्व लपवुन उभे राहील्याची खात्री झाल्यानंतर मी व पंच क्र.1 श्री. चंदनशिव असे आमचे श्रीकृष्ण अॅक्वा आरओ प्लान्ट येथे हजर असतांना लोकसेवक वायरमन श्री. पारधी हे त्यांचे मोटार सायकलने सदर ठिकाणी आले. त्यांनी त्यांचे वाहन उभे करून माझेशी कामासंबधी बोलणी केली. सदर बोलणी दरम्यान मी त्यांना म्हणालो की, एक मिनिट बोलण तर करू त्यांच्यांशी (कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांना उद्देशुन), त्यावर वायरमन श्री. पारधी म्हणाले की, साहेबाचा फोन आलता की, नाही म्हणूनच साहेब म्हणी की, त्यायले एकदा सांगून दया, म्हणजे फोनवर काही सांगु नका, टेन्शन नका घेवू, असा झाला तो विषय, मीच बोलतो फोनवर तुम्ही नका बोलु, असे म्हणुन कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांना फोन लावला. त्यानंतर त्यांनी मोबाईल फोन स्पीकर ऑन करून मी तसेच वायरमन श्री. पारधी व कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांचेमध्ये बोलणी झाली. सदर बोलणी दरम्यान वायरमन श्री. पारधी हे कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांना म्हणाले की, साहेब मी भेटलो

त्यावले, सगळं जावू दया, आता म्हणजे ते आम्हाले फोन आले ते तुम्ही एकदा बोलून घ्या तुम्ही त्याच सोबत, त्यावर कनिष्ठ अभियंता क्षिरसागर म्हणाले की, हा, त्यावर मी म्हणालो की, हॅलो हे तुम्हीन विस हजार रूपये म्हटले होते क नी पवार मले बुवा विस हजार रूपये घ्यान मोडून टाका, ते तुम्हीन हॉटेलवर बोलेले होते त. त्यावर कनिष्ठ अभियंता क्षिरसागर म्हणाले की, हा, तेव्हा मी म्हणालो की, तर म्या केली व्यवस्था आणले मार्केट मधून, त्या आपल्या त्या येच्याकडून काय म्हणता तो अडत्याकडून, त्यावर कनिष्ठ अभियंता क्षिरसागर म्हणाले की, देवून दया न मग त्यांच्याकडे, त्यावर मी वायरमन श्री. पारधी यांना म्हणाले की, घेवून घेणं, तेव्हा कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर फोनवरुन वायरमन श्री. पारधी यांना म्हणाले की, घेवून घेणं, तो म्हणते तर काही विषय आहे का, असे म्हटले. त्यावर वायरमन श्री. पारधी म्हणाले की, नाही नाही काही विषय नाही, ठिक आहे साहेब आता कस आहे, मी काही घेत नाही सध्या, जाऊ दयानं जे झाल ते त्यांच्या मध्ये आटापून घ्या, ते मोडून टाका ते सर्व जे काही अशीन ते असे म्हणुन फोन बंद केला व काही वेळ बोलणी करुन मला सांगीतले की, साहेबांना भेटुन घ्या एकदा असे म्हणुन लाच रक्कम न स्विकारता तेथुन निघुन गेले. व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस निरीक्षक श्री. इंगळे व दोन्ही पंच तसेच कार्यवाही पथकातील सदस्यांनी ऐकले. सदर संभाषणावरुन तसेच पंच क्र.1 श्री.चंदनशिव यांच्या सांगण्यावरुन कारवाई पथकाची खात्री झाली की, दिनांक 29.01.2024 रोजी श्रीकृष्णा अॅक्वा आरओ प्लान्ट येथे आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान वायरमन श्री. पारधी यांची भेट घेतली असता ते लाच रक्कम लाच रक्कम न स्विकारता साहेबांना भेटा असे म्हणुन तेथुन निघुन गेले. त्यामुळे सदर प्रकरणात उदया दिनांक 30.01.2024 रोजी कनिष्ठ अभियंता श्री. क्षिरसागर यांचेवर सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याबाबत तसा सविस्तर सापळा पंचनामा तयार करण्यात आला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ANIL SHANKAR GOPAL(I (Inspector)) / PCMH85080 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb Impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** ANIL SHANKAR GOP.
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMH85080